महाराष्ट्र ~~इलेक्ट्रॉनिकी~~ महामंडळाचा सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचा ४१ वा वार्षिक अहवाल विधानमंडळाच्या सभागृहासमोर सादर करण्यास झालेल्या विलंबाची कारणे खालील प्रमाणे आहेत :-

महाराष्ट्र ~~इलेक्ट्रॉनिकी~~ महामंडळाचा सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचा (४१ वा) वार्षिक अहवाल विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहासमोर कंपनी अधिनियम २०१३ मधील कलम ३९५(१) (ब) अन्वये वार्षिक लेखे तयार झाल्यावर लेखा अहवाल विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर करणे बंधनकारक आहे.

सदर वार्षिक अहवाल विधान मंडळास सादर करण्यासाठी झालेल्या विलंबाची कारणे खालीलप्रमाणे आहे:-

i. शासन निर्णय क्र.एमएलटी/सीआर/३४०१/उद्योग-७, दिनांक ३०/१०/२००३ नुसार महाराष्ट्र ~~इलेक्ट्रॉनिकी~~ महामंडळातील सर्व कर्मचाऱ्यांना स्वेच्छानिवृत्ती देण्यात येवून महामंडळाचे कामकाज दिनांक ०१/१२/२००३ पासून बंद करण्यात आले आहे. तसेच समापनाची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

ii. सध्या महामंडळात नियमित कर्मचारी नाही. समापनाच्या कार्यवाहीकरीता निरनिराळी विवरणपत्रे दाखल करणे, लेखे अद्ययावत करणे, संविधानिक लेखापरीक्षण, महालेखापालांचे लेखापरिक्षण व अहवाल, संचालक मंडळाच्या बैठका आयोजित करणे इ.बाबींसाठी ३ कर्मचारी बाह्यस्त्रोताद्वारे नेमण्यात आलेले आहेत.

iii. महाराष्ट्र ~~इलेक्ट्रॉनिकी~~ महामंडळाला आयकर विभागाकडून करनिर्धारण प्रक्रियेमध्ये दंड आकारण्यात आला होता. आयकर विभागाकडून सन २०१८ मध्ये महामंडळाचे बँक खाते गोठवण्यात आले होते व सन २०१९ मध्ये आयकर विभागाकडून मुदत ठेवीची रक्कम परस्पर वळती करून घेण्यात आली होती. त्याविरुध्द महामंडळाने अपील दाखल केले होते. प्रलंबित अपीलाच्या निर्णयान्वये महामंडळाचा दंड माफ झाला व सन २०२३ मध्ये त्याचा परतावा महामंडळास मिळाला. या दरम्यानच्या काळात निधीअभावी बाह्यस्त्रोताद्वारे दिल्या जाणाऱ्या वेतनासहीत अन्य प्रशासकीय व सांविधानिक बाबींची पुर्तता करणे महामंडळास शक्य झाले नाही.

त्यामुळे अहवाल विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात विहित मुदतीत सादर करता आलेला नाही. हा विलंब क्षमापित करुन सदर अहवाल महाराष्ट्र विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर करण्यास अनुमती द्यावी, ही विनंती.

(अजित सासुलकर)
उप सचिव (उद्योग), महाराष्ट्र शासन.